फक्त सभासदांसाठी
वर्ष ४४वे, अंक ८वा ❋ फेब्रुवारी २०२६

सभा : मंगळवारी संध्या. ६.३० वा.
रूईया मूक बधिर शाळेचे सभागृह,
स.प.महाविद्यालय प्रांगण (मागची बाजू)

# स्नेह सेवा

# मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी, पुणे

नोंदणी क्र. MAH /1528/06/Pune, दिनांक ७ सप्टेंबर २००६
पत्रव्यवहारासाठी पत्ता :
द्वारा-प्रबोध, १०७०, शुक्रवार पेठ, सुभाषनगर लेन नं. ६, पुणे ४११००२.
snehseva1981@gmail.com

❋ अध्यक्ष ❋
डॉ.राधा संगमनेरकर
मो. ९८८१३०७२७८

❋ संपादक ❋
प्रा. रवींद्र कोठावदे
मो.९८६०४२४३४९

## बहुरंगी मैफल (चर्पट-मंजिरी)

मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी स्नेहसेवामध्ये प्रसिद्ध सूत्रसंचालिका आणि म्हणजे 'चर्पट-मंजिरी' हा एकपात्री प्रयोग सादर करणाऱ्या सौ. मंजिरी धामणकर यांनी संगीत, काव्य, विनोदाची प्रसन्न मैफल रंगवली.

सौ. मंजिरी धामणकर या बहुभाषी आहेत. आतापर्यंत त्यांचे आठशे प्रयोग झालेत, दहा पुस्तके प्रकाशित झालेली आहेत, १६ पुस्तकांचा अनुवाद त्यांनी केलेला आहे, त्या एकपात्री प्रयोग करतात, निवेदिका आहेत. असे हे बहुआयामी व्यक्तिमत्व आहे.

श्री गजाननाचे आवाहन करुन त्या म्हणाल्या की, आपल्या संस्कृतीत प्रत्येक गुणासाठी विशेष देव आहे. त्यांनी मार्मिक उदाहरणे देऊन सांगितले की, एका व्यक्तीची बायको जत्रेत हरवली म्हणून तो रामाकडे गेला; तेव्हा राम म्हणाले की, माझी बायको सीता हरवली तेव्हा हनुमानाने तिला शोधून काढले. तोच तुमची बायको शोधून देईल. प्रसंग निभावण्यासाठी वेळेवर केलेल्या पर्यायी व्यवस्थेतून कसे विनोद निर्माण होतात, हे त्यांनी दाखवून दिले.

नाटकाच्या गायनासाठी तमाशाच्या फडातील कलाकार घेतल्यावर होणारी फजिती ऐकताना सर्वजण हास्यकल्लोळात बुडाले. लहान मुलं मोठ्यांना प्रश्न विचारुन कशी हजरजबाबी उत्तर देतात हेही त्यांनी सांगितले.

डेक्कनचे पाणी कोथरुडला का येत नाही? कारण मध्ये नळ-स्टॉप आहे. पुलंना एका चाहत्याचे पत्र आले की, मी घरात ज्ञानेश्वरमहाराजांबरोबर तुमचा फोटो लावलाय. इतका मी तुम्हाला मानतो. त्यावर पु ल म्हणालेत की, मला लोक ज्ञानेश्वरांचा रेडा समजतील जो वेद बोलतो.

गझल म्हणजे मेहबूबा से बात करने का तरीका. गालिबच्या शायरीतील अर्थ त्यांनी उघडून दाखवला.

निरक्षर बहिणाबाईंच्या कवितांमधून माय मराठी समृद्ध भाषेचे सौंदर्य उलगडून सांगितलं. मराठी भाषा नीट येत नसल्यास होणाऱ्या गमती जमती - रेडिओवरची आरजे म्हणाली की, मी आज नवीन मराठी शब्द शिकले - 'अवाक'. बाजारात आज मिरच्यांची अवाक झाली.

निवेदकाच्या गमती जमती - एक निवेदक द. मा. मिरासदारांची ओळख करुन देतांना म्हणाले की, त्यांच्याबद्दल काय सांगावे- कोळसा उगाळावा तेवढा काळाच. डॉक्टरांची ओळख करुन देतांना एकजण म्हणाले की, कवी शब्दांशी खेळतात आणि डॉक्टर पेशंटच्या जीवाशी खेळतात.

निवेदकात हजरजबाबीपणा आणि घटना सकारात्मकतेने हाताळण्याचा गुण हवा. सांधेदुखी ह्या विषयावर डॉक्टरांचे संमेलन होते. त्यात त्यांचे भाषण ठेवले होते. तेव्हा त्यांनी समयसूचकतेने सांधे म्हणजे जोड. माणसांनी एकमेकांना जोडावे, त्याकरता प्रेमाचे वंगण वापरावे म्हणजे हे जोड कुरकुरणार नाहीत, असे सांगितले.

किशोरकुमार यांच्या गाण्याबरोबर त्यांनी सगळ्यांना अशा स्वप्नांच्या दुनियेत नेलं की, जहाँ गम भी न हो, आसूं भी न हो, ऐसे गगन के तले.

सौ. मंजिरीताईंच्या कार्यक्रमाची कॅप्सूल घेऊन सर्व स्नेहीजनांची दुखणी पळाली.

ह्या कार्यक्रमात त्यांचा परिचय श्री. प्रदीप वाघ यांनी करुन दिला, तर श्री. संजय गर्गे यांनी आभार प्रदर्शन केले.

सौ. प्रवीणा आंबुलकर

## सुनीता बाई

स्नेहसेवामध्ये मंगळवार, दि. १० फेब्रुवारी रोजी श्री. अमोल जोशी ह्यांनी सुनीताबाईंच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्यावर एक कार्यक्रम सादर केला.

नवसह्याद्री ज्येष्ठ नागरिक संघामधील श्री. जोशी हे सभासद. CDSS मधील नोकरी करता करता पेटी वाजवण्याचा आणि वाचनाचा छंद जपणारे... आणि त्यातूनच सुनीताबाईंवरील ह्या कार्यक्रमाची कल्पना त्यांना सुचली.

पु.ल. हे अखख्या महाराष्ट्राचे दैवत, खळखळून हसवणारे, अत्यंत प्रतिभावंत, स्वच्छंदी आणि हजरजबाबी व्यक्तिमत्व,

आणि अशा व्यक्तिमत्वाला सांभाळणे, त्यांच्यातील कलात्मकता जोपासणे, आर्थिक व्यवहार सांभाळणे, जन्मभराची सहचारिणी म्हणून मार्गदर्शन करणे, हे खरं म्हणजे अदृश्य काम सांभाळणाऱ्या सुनीताबाई. त्यांचे तळपत्या विजेसारखे एक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्व आणि त्यांचा ताठ कणा हे आजच्या व्याख्यानातून उलगडले.

त्यांच्या लग्नाच्या दुसऱ्या दिवशी, बोटीतून जाताना त्यांनी गायलेले झाला उषःकाल राणी ह्या गीताचा लेखात आवर्जून उल्लेख केला आहे. तसेच, बाळ ठाकरे हे पु.लं.चे विद्यार्थी आणि श्रीकांत ठाकरे हे सुनीताबाईंचे विद्यार्थी. ही मजेदार आठवण पण त्या लेखात सांगितली आहे.

एकदा मैत्र जुळले की ते असोशीने जपणाऱ्या सुनीताबाईंचे अनवट पैलू दाखवणारा लेख, जो सुभाष अवचट ह्या सिद्धहस्त चित्रकाराने त्यांच्या खुमासदार शैलीत लिहिलेला. हा लेख त्यांनी समग्र वाचून दाखवला. श्री. अवचट ह्यांनी, त्यांना भावलेल्या सुनीताबाई शब्द रंगात इतक्या सुरेख रंगवल्या आहेत की, त्या लेखाचे, तो लेख ज्या दिवशी लोकसत्तामध्ये आला होता, त्याच दिवशी २ ते ३ वेळा पारायण केले होते.

श्री. जोशी ह्यांनी तो समग्र लेख वाचून दाखवत पुन:प्रत्ययाचा आनंद मात्र दिला. आवाजातील चढउतार अगदी योग्य पद्धतीने वापरुन तो लेख वाचून दाखवला.

त्यातील एक आठवण लक्षात राहण्याजोगी. सुनीताबाईंचा बाकी बाब ह्यांच्या कवितांच्या वाचनाचा बालगंधर्व रंगमंदिरातला कार्यक्रम. मागे काळा पडदा, स्टेजवर एकच खुर्ची, कुठलेही नेपथ्य नाही, बाकी कोणतीही प्रॉपर्टी नाही, फक्त बोरकरांची कविता आणि सुनीताबाईंचा धारदार, प्रसंगी कोमल होत गेलेला आवाज, आणि त्या उधाणलेल्या लाटांवर डोलणारा अथांग जनसागर. हे प्रत्यक्ष बघायचा योग श्री. अवचट ह्यांना आला आणि त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. हे वर्णन प्रत्यक्षातूनच वाचायला हवे इतके प्रभावी आहे.

त्याच दरम्यान आहे मनोहर तरी हे पुस्तक लिहून त्यांनी साहित्य वर्तुळात एक छोटा बॉम्बही फोडला, असेही अवचट सांगतात..

पु.ल. यांच्या निधनानंतर श्री अवचट यांनी पु.लं.वर एक लेख २००० सालच्या दिवाळी अंकात लिहिला होता. तो लेखही अर्थातच वाचनात आलेला होताच. त्या लेखाचेही त्यांनी वाचन केले आणि स्नेहसेवींनी पुन्हा एकदा तो लेख अनुभवला.

पु. ल. गेल्यावर सुनीताबाईंमधली चमचमती बाजू हळूहळू लोप पावत गेली. शब्द प्रभू असलेल्या पु. ल. ह्यांच्यावर हळवे होऊन लिहिलेला लेख, पुन्हा एकदा मन:चक्षुसमोर तरळला .

त्यानंतर सुनीताबाई आणि पु. ल. ह्यांच्या आवाजातील कविता मोबाईलवरुन श्री. जोशी यांनी ऐकवल्या.

सौ. प्रज्ञा यार्दी यांनी श्री. अमोल जोशी यांचा परिचय करुन दिला.

शेवटी अलकाताई ह्यांनी आभार मानताना दोन किस्से सांगितले. आणीबाणीच्या वेळी पु.लं.ची व्याख्याने खूपच गाजली. पण निवडणुकीच्या विजय सभेत सुनीताबाईंनी त्यांना व्याख्यान देण्यापासून रोखले आणि सांगितले की, राजकारण हा आपला विषय नाही.

अजून एक किस्सा त्यांनी सांगितला की, माझ्या वाढदिवशी मला गिफ्ट हवे आहे. ते म्हणजे अंमलदार नाटक (दोन अंकांनंतरच्या पुढील लेखनाला मुहूर्त लागत नसल्याने अर्धवट लिहून झाले होते) लवकरात लवकर लिहून पूर्ण कर. आणि पु.लं.नी पुढील दोनच दिवसात हे नाटक लिहून पूर्ण केले.

ह्या दोन्ही किश्यामधून सुनीताबाईंचा खंबीरपणाही दृग्गोचर झाला.

सुनीताबाईंच्या जन्मशताब्दीनिमित्त केलेला कार्यक्रम चांगलाच रंगला.

**सौ ऋचा सावरकर**

## राष्ट्रीय युद्ध स्मारक

(National War Memorial)

संस्था भेट हा स्नेहसेवाच्या अनेक उपक्रमांपैकी उत्तम असा उपक्रम आहे. पुण्यामध्ये अनेक संस्था अतिशय शांतपणे वेगवेगळ्या क्षेत्रात उत्तम कामगिरी करीत असतात. या संस्थांना भेटी देऊन त्यांच्या कामगिरीची माहिती करुन घेणे, हा संस्था भेटीचा उद्देश असतो.

या उपक्रमांतर्गत स्नेहसेवा सभासदांची सदर्न कमांड वॉर मेमोरियल या संस्थेला भेट देण्याचा कार्यक्रम दि. २१ फेब्रुवारी, २०२६ रोजी पार पडला. या निमित्ताने भारतीय सैन्याच्या तिन्ही म्हणजे पायदळ, वायुदल आणि नौसेना यांची कामे कशी चालतात आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या दलांनी काय काय कामगिरी केली, हे बघायला मिळते. अतिशय दैदिप्यमान असा इतिहास आहे हा आणि तो या भेटीद्वारे अनुभवता आला.

ही अशी स्मारके म्हणजे देशाच्या रक्षणाची कामगिरी करतांना वीरमरण आलेल्या आपल्या शूरवीर जवानांना अर्पण केलेली विनम्र श्रद्धांजली असते. या निमित्ताने आपल्या पुढील पिढीला हा इतिहास माहीत व्हावा आणि त्यातून स्फूर्ती मिळावी, असाही उद्देश असतो.

'National War Memorial Southern Command' हे १९९८ मध्ये स्थापन झाले. या शौर्य

स्मारकाचे वैशिष्ट्य म्हणजे हे नागरिकांच्या सहभागातून निर्माण झालेले आहे.

हे सदर्न कमांडच्या अखत्यारीत येते. Southern Command ही सर्वात जुनी आणि भौगोलिक दृष्ट्या सर्वात मोठी कमांड आहे. याची स्थापना एप्रिल १८९५ रोजी झाली.

सदर्न कमांडचे नेतृत्व लेफ्टनंट जनरल या श्रेणीचा अधिकारी करतो.

सदर्न कमांड भारताच्या जवळजवळ ४०% भूभागाची जबाबदारी सांभाळते. म्हणजे महाराष्ट्र, गुजरात, राजस्थानचा काही भाग, गोवा, कर्नाटक, तमिळनाडू, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि केरळ. याशिवाय लक्षद्वीप आणि अंदमान निकोबार बेटे यांच्या संरक्षणाची जबाबदारीही सदर्न कमांडची असते.

पुण्यातील सुप्रसिद्ध नॅशनल डिफेन्स अकॅडमी, आर्मड फोर्सेस मेडिकल कॉलेज आणि बंगलोर आणि चेन्नई येथील लष्करी प्रशिक्षण केंद्रे ही पण या कमांडच्या अखत्यारीत येतात.

स्मारकाचे विविध विभाग आहेत. प्रवेश केल्याबरोबर मुख्य स्मारकस्तंभ आपल्या दृष्टीस पडतो. हा ग्रॅनाईटचा स्तंभ १८ मीटर उंचीचा असून वरून पाहिलं असता त्रिकोणी दिसतो. हा खालून जरी एकसंध असला तरी वरून पाहिल्यास याला तीन टोके दिसतात. ही तीन टोके म्हणजे पायदळ, वायुदल आणि नौसेना यांची प्रतीके आहेत. याचाच अर्थ या तिन्ही सैन्य दलात अतिशय सुंदर असा समन्वय आहे आणि युद्धप्रसंगी ही तिन्ही दले मिळून शत्रूचा निकाल लावतात.

या स्तंभाच्या मागेच ध्वजमार्ग आहे. तेथे पाच प्रकारचे ध्वज लावलेले आहेत. भारतीय तिन्ही शस्त्र दलांचे म्हणजेच नौदल, पायदळ आणि वायुदल आणि सदर्न कमांडचे चार आणि सगळ्यात उंच असा आपल्या भारताचा डौलाने फडकत असलेला तिरंगा!!!

या स्तंभाच्या तिन्ही बाजूस पांढरे संगमरवरी फलक आहेत. १९४७ सालापासून ते आजपर्यंत वेगवेगळ्या युद्धात आपल्या सुमारे २,८०० जवानांना वीरगती प्राप्त झाली. त्यांची आठवण म्हणून त्यांची नावे या फलकांवर कोरलेली आहेत. ही नावे वाचतांना आपले डोळे पाणावतात.

या स्तंभाच्या डावीकडे आत्तापर्यंत झालेल्या युद्धांची छायाचित्रे आणि त्यांचा थोडक्यात इतिहास दाखविलेला आहे. १९४७ चे काश्मीर युद्ध, १९४८ चे हैदराबाद संस्थान विलीनीकरणाचे युद्ध, १९६१ चे गोवा मुक्तीचे युद्ध, १९६२ चे चीनबरोबर झालेले युद्ध, १९६५ आणि १९७१ मधील पाकिस्तानबरोबर झालेले युद्ध आणि १९९९ मध्ये झालेले कारगिल युद्ध. या सर्व युद्धांचा इतिहास पाहतांना आपल्या सैन्याबद्दल असलेला आपला अभिमान अधिकच दुणावतो.

पण त्याचबरोबर १९६२ च्या चीनबरोबरील युद्धाचा सल आपल्या मनातून जात नाही. अपुरी शस्त्रे, अपुरी साधन सामग्री, थंड प्रदेशात लढाई करण्यासाठी लागणारे सुयोग्य कपडे नाहीत, दारुगोळ्याचा, अन्नाचा पुरवठा नाही आणि शत्रू चालून येत असल्याचे दिसत असतांना सुद्धा राजकीय पुढाऱ्यांचे गोंधळलेले नेतृत्व, यामुळे अत्यंत शौर्य गाजवून सुद्धा आपल्याला यश मिळू शकले नाही. पण सुदैवाने या काळ्याकुट्ट इतिहासातून आपण लवकरच बाहेर पडलो.

त्यापुढे आपण गेलो की संग्रहालय आहे. त्यामध्ये १९७१ च्या युद्धातील दुर्मिळ छायाचित्रे आहेत. त्याचबरोबर वेगवेगळी शौर्य पदके, लहान लहान शस्त्रे, तिन्ही दलातील सैनिकांचे वेगवेगळे गणवेश, अशा अनेक गोष्टी आपल्याला बघायला मिळतात.

त्याच्या शेजारीच आपल्या सर्व मराठी बांधवांना अभिमान वाटेल असे दालन म्हणजे मराठा गॅलरी आहे. बाहेरच आपल्या सर्व मराठी बांधवांना अत्यंत पूजनीय अशा छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा आहे. अत्यंत डौलदार पद्धतीने महाराज अश्वारुढ झालेले आहेत. हातात तलवार आहे आणि नजरेत स्वराज्याचे स्वप्न आहे. हा पुतळा बघताना आपण आपोआपच नतमस्तक होऊन महाराजांना अभिवादन करतो. मराठा दालनामध्ये बाल शिवाजी आणि जिजाऊमाता यांचे पुतळे आहेत. तसेच, मराठी साम्राज्याची पताका अटकेपार नेणारे श्रीमंत नानासाहेब पेशवा यांचा पण दिमाखदार पुतळा आहे. आणि मराठी साम्राज्याची यशोगाथा सांगणारी अनेक चित्रे आहेत. अर्थातच, हे दालन म्हणजे मराठी बांधवांसाठी कौतुकाचा आणि अभिमानाचा विषय आहेत.

मराठी दालनातून बाहेर पडल्यावर आपल्याला दिसते ती अवजड शस्त्रसामग्री, विमाने, रणगाडे, चिलखती गाड्या आणि इतर अनेक गोष्टी.

मिग २३ BN या लढाऊ विमानाने कारगिल युद्धात अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावली होती. ते विमान आपल्याला बघायला मिळते. तसेच पहिला संपूर्ण भारतीय बनावटीचा विजयंता रणगाडा, ज्या रणगाड्याने १९७१ च्या युद्धात अत्यंत मोलाची कामगिरी बजावली होती, तो रणगाडाही बघायला मिळाला. रणगाड्याने १९७१ च्या युद्धात अत्यंत मोलाची कामगिरी बजावली होती. तो रणगाडाही बघायला मिळाला. तसेच, नौदलाची खछड त्रिशूल या युद्धनौकेची प्रतिकृती सुद्धा ठेवलेली आहे. हे सर्व अगदी जवळून बघताना मन अगदी भारावून गेले होते.

आणि आधीच सूचना दिल्याप्रमाणे ठीक ५.५५ वा. 'बीटिंग रिट्रिट' या कार्यक्रमाला सुरुवात झाली. अत्यंत

शिस्तीमध्ये, परंतु बँडच्या तालावर जवानांची परेड सुरु झाली. प्रत्येक जवानाचा हात आणि पाय यांच्या हालचाली इतक्या समन्वय साधणाऱ्या होत्या की, मन आश्चर्याने थक्क होऊन जाते. जवान मार्च रुट करीत तिरंग्याजवळ पोहचले. त्यानंतर तशाच तालबद्ध पद्धतीने पावले टाकत जवानांची एक तुकडी तिरंग्याच्या मागे लावलेल्या चारही झेंड्याजवळ पोहचली. हे चारही झेंडे अतिशय गंभीर वातावरणात उतरविण्यात आले. तोपर्यंत मागे असलेली तुकडी जराही हालचाल न करता अतिशय स्तब्ध उभी होती – जणू काही पुतळेच उभे आहेत.

झेंडे उतरवून झाल्यावर पहिली तुकडी तालबद्ध पावले टाकीत परत आली आणि उभ्या असलेल्या तुकडीत सामील झाली आणि मग सर्वजण परत शिस्तीत तालबद्ध पावले टाकीत निघून गेले आणि बीटिंग रिट्रिट परेड संपली.

हे सर्व बघून होते आहे तोवर लष्करी बँडची वेळ झाली होती. अगदी बरोबर ६.१५ वा. बँडवरील संगीत चालू झाले. सर्वजण अगदी मनापासून बँडच्या संगीताला दाद देत होते आणि एकदम 'याहा डाल डाल पर सोनेकी चिडीया' हे गाणे वाजू लागले आणि सर्वांच्या उत्साहाला उधाण आले. सगळ्यांनी ठेका धरला. सर्वजणच देशभक्तीने भारावून गेले होते. बँड ठरलेल्या वेळेस संपला आणि प्रेक्षक वर्ग लाईट अँड साऊंड शोसाठी सज्ज होऊन वाट बघू लागला.

विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे कार्यक्रमातील सर्व वेळा इतक्या काटेकोरपणे पाळल्या जात होत्या की त्याचे कौतुक केल्यावाचून राहवत नाही.

सगळे वाट पाहत असताना एकदम अंधार झाला धडाम असा आवाज झाला आणि समोरच्या पडद्यावर युद्ध सुरु झाल्याचे दृश्य अवतरले, तोफा, रणगाडे धडधडू लागले. त्याच वेळी आजूबाजूच्या झाडांवर प्रकाश सोडण्यात आल्यामुळे झाडे पण रंगीबेरंगी झाली. आतापर्यंत झालेल्या युद्धांची दृश्य समोर साकारत होती आणि प्रेक्षक मंत्रमुग्ध होऊन पाहत होते. युद्धाची भीषणता मात्र जाणवून गेली आणि प्राणपणाने लढणाऱ्या आपल्या जवानांच्या कौतुकाने मन अगदी भरुन आले आणि अशा भारावलेल्या वातावरणातच कार्यक्रम संपन्न झाला.

माझी खात्री आहे की घरी जाताना प्रत्येकाचे मन भारतीय सेनेच्या अभिमानाने भरुन आले असेल. अतिशय देखणा आणि अप्रतिम असा अनुभव घेऊन सर्वजण मार्गस्थ झाले.

या अतिशय अविस्मरणीय अशा संस्था भेटीचे नियोजन, अंमलबजावणी, स्नेहीजनांसाठी बसचे नियोजन आणि अल्पोपाहाराची व्यवस्था करणाऱ्या आपल्या अध्यक्षा डॉ. राधाताई, सचिव नीलाताई आणि अर्थातच हे सर्व प्रत्यक्ष अत्यंत निगुतीने मॅनेज करणाऱ्या श्री. तुषार आणि रेखाताई कसरेकर यांचे मनापासून कौतुक आणि आभार.

**अविनाश जोशी**

## संत साहित्यातील जैविक विज्ञान

मंगळवार, दि.२४ फेब्रुवारी, २०२६ रोजी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर भगत यांचे 'संत साहित्यातील जैविक विज्ञान' या विषयावर व्याख्यान झाले. विषय अगदी वेगळा असल्यामुळे सर्वांनाच या व्याख्यानाबद्दल उत्सुकता होती.

डॉ. भगत यांनी 'मराठी वाङ्मय आणि जैव तंत्रज्ञान यांचा विजिगीषु अभ्यास' या विषयावर विद्यावाचस्पती (झह.ऊ) पदवी संपादन केली. घरात जुनी गुरु परंपरा होती. त्यामुळे संत साहित्याकडे त्यांचा ओढा असणे स्वाभाविक होते. त्यावर संशोधन करुन लिखाण झाले तर पुढे लोकांना उपयोगी पडेल असे त्यांना वाटले. म्हणून त्यांनी हा विषय प्रबंधासाठी निवडला.

जैव तंत्रज्ञान म्हणजे जीवाचा किंवा त्याच्या अंगाचा व्यापारासाठी केलेला वापर होय. दही किंवा लोणचे बनवण्याची प्रक्रिया हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. डॉ. भगत यांनी विश्वाच्या उत्पत्तीपासून आतापर्यंत वेगवेगळ्या क्षेत्रात जैविक तंत्रज्ञानाचा कसा कसा उपयोग झाला किंवा अजूनही होतो आहे आणि त्याबद्दल संत साहित्यात कसे उल्लेख आहेत, ते विस्ताराने सांगितले. शिवलीलामृत, एकनाथी भागवत, समर्थांचा दासबोध आणि ज्ञानेश्वरीत विश्वाची उत्पत्ती याबद्दल माहिती दिली असल्याचे त्यांनी सांगितले.

सुमारे ३५० कोटी वर्षांपूर्वी पहिला जीव निर्माण झाला. त्याला हिरण्यगर्भ असे म्हटले आहे. वेद उपनिषदातील हिरण्यगर्भाची कल्पना आधुनिक डीएनएशी जुळते. मुकुंदराज यांच्या विवेकसिंधू या सुमारे ८२५ वर्षांपूर्वी हिरण्यगर्भाचे वर्णन आणि त्यापासून लिंग आणि शरीरातील अवयव कसे तयार होतात, याचे सविस्तर वर्णन केलेले आहे आणि ते आधुनिक डीएनएशी जुळते असे डॉ. भगत यांनी सांगितले. त्यांनी संत एकनाथ, संत तुकाराम आणि संत रामदास यांनी जैव तंत्रज्ञानाचा उल्लेख कसा आणि कुठे केला तेही सांगितले.

डॉ. भगत यांना संशोधन करतांना पूर्वीपासून वेगवेगळ्या गोष्टीत जैव तंत्रज्ञानाचा उपयोग झाल्याचे आढळले. उदा. पाकोळ्यांचा वास घालवण्यासाठी, डास घालवण्यासाठी, पाणी शुद्ध करण्यासाठी हिमालयातील इनफ्रेडा तणापासून सोमरस बनवणे, चरक संहितेत सांगितलेले मधाचे तीन प्रकार वगैरे. त्यांना जैव तंत्रज्ञानाची आधुनिक तंत्रज्ञानाशी सांगड घातलेली दिसली. जैव तंत्रज्ञान आणि अनुवंशिकता यांची सांगड संत ज्ञानेश्वरांनी आणि सन १८६५ मध्ये ग्रेगर मेंडेल यांनी कशी घातली, ते त्यांनी सांगितले.

जैव तंत्रज्ञानाचे असंख्य उपयोग आहेत आणि ते वेगवेगळ्या

संतांनी त्यांच्या ग्रंथात लिहिलेले सापडतात. जैव तंत्रज्ञानाचे तीन तोटेही आहेत, असे डॉ. भगत यांनी व्याख्यानाच्या शेवटी सांगितले – ते म्हणजे नैतिकता, आर्थिक चिंता आणि पर्यावरण हे होत. या तीनही बाबतीत जैव तंत्रज्ञानाचा उपयोग झाला नाही, असे त्यांना आढळले.

डॉ. भगत यांचा परिचय श्री. रवींद्र घाटपांडे यांनी करुन दिला. आभार प्रदर्शन श्री. तुषार कसरेकर यांनी केले.

**अरविंद भडकमकर**

## आंतरराष्ट्रीय महिला दिन

८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन! महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय कामगिरीचा गौरव करणारा आणि लैंगिक समानतेचा पुरस्कार करणारा हा दिवस.

स्त्रियांच्या हक्कांचा आदर, त्यांचे सक्षमीकरण आणि समाजातील त्यांच्या अतुलनीय योगदानाला सलाम करण्यासाठी हा दिवस साजरा करतात. खरं तर स्त्री म्हणजे केवळ एक व्यक्ती नसून ती सहनशक्ती, प्रेम, त्याग आणि कर्तृत्वाची साक्षात मूर्ती आहे.

आज शिक्षण, विज्ञान, राजकारण, क्रीडा, व्यवसाय अशा सर्वच क्षेत्रात तिने यशाची पताका फडकवली आहे.

कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून बाह्य जगातही आपला ठसा उमटवणाऱ्या प्रत्येक स्त्रीला, स्नेहसेवातील तमाम माता-भगिनींना या निमित्ताने मानाचा मुजरा.

## कॉकटेल!!!

आधीच्या पिढीकडून पैसे वाचवायला शिकलो;
नंतरच्या पिढीकडून पैसा वापरायला शिकतोय!
आधीच्या पिढीकडून सहवासाने नाती जपायला शिकलो;
नंतरच्या पिढीकडून डिजिटली नवीन नाती जोडायला शिकतोय!
आधीच्या पिढीकडून मन मारुन जगायला शिकलो;
नंतरच्या पिढीकडून मन भरुन जगायला शिकतोय!
आधीच्या पिढीने, 'वापरा आणि अधिक वापरा'मधली उपयुक्तता शिकवली;
नंतरच्या पिढीकडून 'वापरा आणि फेका'मधली नावीन्याची गंमत अनुभवायला शिकतोय!
आईकडून पिकनिकलाही घरच्या पोळीभाजीची लज्जत अनुभवायला शिकलो;
मुलांकडून घरात असतानाही पिकनिक एंजॉय करायला शिकतोय!
आधीच्या पिढीबरोबर निरांजन लावून दिवा उजळून वाढदिवस साजरा केला;
नंतरच्या पिढीबरोबर मेणबत्ती विझवून, अंधार करुन वाढदिवस साजरा करायला लागलो!
आधीच्या पिढीने बिंबवले, घरचेच लोणी सर्वात उत्तम;
नंतरची पिढी पटवून देत आहे अमूल बटरला पर्याय नाही!
थोडक्यात काय, आधीच्या पिढीने शिकवले अधिक वर्षे कसे जगायचे ते;
तर नंतरची पिढी शिकवत आहे मरणापर्यंत आनंद घेत कसं जगायचं ते!
आपण दोन्हीचे 'कॉकटेल' बनवुन आयुष्य सुखी, समाधानी करीत रहावं!
आयुष्य सुंदर आहे,दृष्टी सकारात्मक हवी!!!
खास आपल्या आपुलकीच्या माणसांसाठी!!!

**ज्ञानदाता : अज्ञात**